# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051
दूरध्वनी : 26556799 फॅक्स : 26556805 ई.मेल :collectormsd@gmail.com

---

**तक्रार क्र. १३१**

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-स्टॅलीन डी/२०२१
दिनांक : ०७/०४/२०२१. 5663

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई
यांचे कार्यालय
आवक क्रमांक:- 179
दिनांक 20/4/2021
वनकर्मचारी विभागीय वन अधिकारी,

**विषय** : Encrochemnt Coming up in CRZ mangroves area during lockdown Shanties that have come up in S.No. 161, Juhu, Versova Link Road, adjoining the beach ahead of Rajiv Gandhi Institute Andheri West ...

**संदर्भ** : 1. श्री. स्टॅलीन डी. यांचा ई-मेल संदेश दि. २६/०६/२०२०.
2. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/का-5/कावि-07/2020 दि. 18/03/2021.

AC F. committee close case

उपरोक्त विषयांकि प्रकरणी संदर्भ क्र. १ अन्वये अर्जदार श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे जुहू ता. अंधेरी येथील वर्सोवा लिंक रोड, स.नं. १६१ राजीव गांधी इस्टीट्युट अंधेरी (प) या ठिकाणी लॉकडाऊन कालावधी मोठ्या प्रमाणात झोपड्या बांधणेत आल्याने कांदळवनाचा / सी.आर.झेड. चा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून कळविलेनूसार संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल विहित नमुन्यात खालीलप्रमाणे सादर आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने स्थळपहाणीच्या वेळी तक्रारदार श्री.स्टॅलीन डी यांना स्थळपाहणीस उपस्थित राहणेसाठी त्यांचे भ्रमणध्वनी क्र.९८२०२३२३०२ वर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने मंडळ अधिकारी, अंधेरी, तलाठी वर्सोवा, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सब इंजिनिअर श्री. विलास येल्ले, वन परिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष यांचे उपस्थितीत स्थळपाहणी केलेली आहे.

सदर अहवालानुसार राजीव गांधी इंस्टीट्युटच्या आजुबाजूच्या परीसराची पाहणी केली असता त्या ठिकाणी कांदळवनाला अंदाजे १० फुट उंचीचे तारेचे कुंपण असून त्या ठिकाणी कोठेही कांदळवनाची तोड झालेली दिसून आली नाही. तसेच सदर ठिकाणी कोठेही अनधिकृत झोपड्या बांधलेल्या दिसून आल्या नाहीत. तसेच कांदळवनाला लागून समुद्रकिनाऱ्याकडून सदर जागेची पाहणी केली असता, खाडीमध्ये कांदळवनाला लागुन होडी उभ्या केलेल्या असून, त्यावर प्लॅस्टीकची ताडपत्री अंथरलेली दिसून आली. सदर ठिकाणी कोठेही झोपड्या दिसून आल्या नाहीत.

प्रकरणी स्थळपाहणी केल्यानंतर तक्रारदार श्री. स्टॅलीन डी यांना भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधून सदर ठिकाणी झोपड्या नसून त्या होड्या असल्याचे त्यांना ज्ञात झाले असून त्यांची काही तक्रार नसल्याचे सांगितले, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी या कार्यालयास सादर केलेला आहे.

सबब, सदर अहवालाच्या अनुषंगाने कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही तसेच सदर ठिकाणी झोपड्या बांधल्याचे आढळून न आल्याचे सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याने सदर तक्रार प्रलंबित तक्रारींच्या यादीमधून वगळणेत यावी.

(स्वाक्षरी)
**( डॉ. विकास नाईक )**
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळ प्रतिवर मा.समन्वय अधिकारी,कांदळवन सं.सं.स.समिती**
**तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.**

**प्रत** : मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीसाठी.

महाराष्ट्रशासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकिय इमारत, ९ वा मजला, शासकिय वसाहत, बांद्रा(पू), मुंबई-४०००५१

दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६ ईमेले- sdomsdest@gmail.com

तात्काळ

cms/21/11278

क्र. उविअ/का-५/कावि- ०७/२०२०
दि.१८/०३/२०२१

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

आ.दि. 23/3/21

जिल्हाधिकारी, ...र जिल्हा यांचे कार्यालय
MAR 2021

विषय :- Encroachments Coming up in CRZ mangroves area during lockdown Shanties that have come up in S.No.१६१, Juhu, Versova Link Road, adjoining the beach ahead of Rajiv Gandhi institute Andheri West

संदर्भ :-१. आपल्याकडील पत्र क्र. सी/टे-८/कांदळवन/कावि-कां.ऱ्हा.११ तक्रारी/२०२०, दि.१६/१०/२०२०
२. तहसीलदार अंधेरी यांचे कडील पत्र क्र. तह/अंधेरी/जमीन/कावि-६२३/२०२०, दि.१८/०३/२०२१

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे संदर्भिय पत्र क्र.१ सोबत प्राप्त झालेला श्री.स्टॅलीन डी. यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार अंधेरी यांनी मंडळ अधिकारी अंधेरी व तलाठी वर्सोवा, बृहन्मुंबई महानगर पालिकेकडील सब इंजिनीअर श्री.विलास येल्ले, वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष यांचे कार्यालयातील वनरक्षक वर्सोवा यांचेमार्फत स्थळपाहणी करुन् अहवाल सादर केला आहे.

स्थळपहाणीच्या वेळी तक्रारदार श्री.स्टॅलीन डी. यांना स्थळपाहणीस उपस्थित राहणेसाठी त्यांचे भ्रमणध्वनी क्र.९८२०२३२३०२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने उक्त नमुद अधिकारी/ कर्मचारी यांचे उपस्थितीत स्थळपाहणी करण्यात आली व तसा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

सदर अहवालानुसार राजीव गांधी इंस्टीट्युटच्या आजुबाजूच्या परिसराची पाहणी केली असता त्या ठिकाणी कांदळवनाला अंदाजे १० फुट उंचीचे तारेचे कुंपण असून त्या ठिकाणी कोठेही कांदळवनाची तोड झालेली दिसून आली नाही. तसेच सदर ठिकाणी कोठेही अनधिकृत झोपड्या बांधलेल्या दिसून आल्या नाहीत.



Scanned by CamScanner

तसेच कांदळवनाला लागून समुद्रकिनाऱ्याकडून सदर जागेची पाहणी केली असता, खाडीमध्ये कांदळवनाला लागुन होडी उभ्या केलेल्या असून, त्यावर प्लॅस्टीकची ताडपत्री अंथरलेली दिसून आली. सदर ठिकाणी कोठेही झोपड्या दिसून आल्या नाहीत.

तसेच स्थळपाहणी नंतर तक्रारदार श्री. स्टॅलीन डी यांना भ्रमणध्वनी व्दारे संपर्क साधून सदर ठिकाणी झोपड्या नसून त्या होड्या असल्याचे त्यांना ज्ञात झाले असून त्यांची काही एक तक्रार नसल्याचे त्यांनी सांगितले. सबब सदरची तक्रार प्रलंबीत तक्रारींच्या यादीतून वगळण्यात यावी, ही विनंती.

सोबत तहसीलदार अंधेरी यांचा अहवाल पान क्र. १ ते माहितीसाठी सविनय सादर.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**



Scanned by CamScanner

# पंचनामा

स्थळ - राजीव गांधी इन्स्टिट्यूट जवळ
जुहु वर्सोवा लिंक रोड, मुंबई ४९
दिनांक - 05/11/2020

आम्ही खालील सह्या करणार पंचलोक कारणे विचारल्यावरून समक्ष हजर राहून सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, मा. तहसिलदार अंधेरी यांचेकडील पत्र क्र. तह/ अंधेरी / जमिन / कावि - 623/2020 दिनांक - 28/10/2020 अन्वये प्राप्त तक्रारदार श्री स्टॅलिन डी यांचे तक्रारी अर्जान्वये मौजे वर्सोवा येथील स.क्र. 161 लगत खाडीपैकी न.भु.क्र. 1376 या मिळकतीवरील राजीव गांधी इन्स्टिट्यूट जवळील समुद्र किनाऱ्यावरील अनाधिकृत झोपड्यांचे स्थळपाहणीकामी तहसिलदार, अंधेरी कार्यालयातील मंडळ अधिकारी, तलाठी, बिएमसीकडील सब इंजिनियर श्री तिलारे येलले आणि वनविभाग खातेकडील वनरक्षक हे उपस्थित राहून तक्रारदार यांना जागादाखविनेकामी उपस्थित राहणेसाठी त्यांचे भ्रमणध्वनी क्रं. 9820232302 या नंबरवर सकाळी ठिक 11:24 ते 11:30 या वेळेत एकूण 5 वेळा फोन केला असता फोन उचलला नाही किंवा प्रतिसाद दिला नाही किंवा स्वतःहून कळवले नाही. तक्रारदार यांनी काहीही जागेवर उपस्थित राहिले नाही.

उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांनी तक्रारीत नमूद जागेची पाहणी केली असता राजीव गांधी इन्स्टिट्यूट च्या जवळ कांदळवन आहे. तसेच सदर जागेवर लागुन अंदाजे 10 उंच तारेचे कुंपन आहे. तसेच सदर जागेवर खाडीमध्ये समुद्र किनाऱ्याकडून जावून पाहणी केली असता जागेवर प्लॅस्टिकची ताडपत्री अंथरलेली किंवा उभ्या केलेल्या असून त्यावर कोठेही कांदळवनाची तोड किंवा झोपड्या दिसून आली. जागेवर कोठेही दिसून आल्या नाहीत.

वरील प्रमाणे जागेची वस्तुस्थिती नमूद पंचनामा वाचून दाखविलेला कायम केला असे

समक्ष
[signature]
[signature]
[signature]
तलाठी वर्सोवा
[signature]
मंडळ अधिकारी वर्सोवा

पंचलोक
1) पंचांनी सही करण्यास नकार दिला.
2)
3)

Scanned by CamScanner